# राग :- मारुबिहाग

विकृत मध्यम शुद्ध स्वर ; गावात मारुबिहाग |
गनि सम्वाद प्रथमरात्रि ; मानत कल्याण थाट ||
कल्याण थाटातून उत्पन्न झालेला राग दोन मध्यम बाकी सर्व स्वर शुद्ध

विशेष जाति :- ओडव - संपूर्ण
वादी :- पंचम (रागविज्ञान) गांधार (रागपरिचय)
संवादी :- षड्ज (रागविज्ञान) निषाद (रागपरिचय)
समय :- रात्री
आरोह :- सा म ग ग मे प प नि सां
अवरोह :- सां नि ध प मे ग , मे ग रे सा, रे नि सां
अवरोह :- सां नि ध प ध ऽ प, प म ग , मे ग सा रे सा

**विशेष :-**

१) नावावरून हा मारु + बिहाग अशा २ रागांचे मिश्रण वाटेल परंतु तसे नाही. यात कल्याण + बिहाग चे मिश्रण आहे. नी सा ग व प नि सां बिहाग वाचक तर पधप सांनिधप, पधमेग मगरेसा कल्याणवाचक.
२) दोन्ही मध्यमांचा वापर तीव्र म आरोह अवरोह दोन्ही मधे तर शुद्ध म फक्त आरोहातच घेतात. बसन्त मधील शुद्ध म घेतात तसाच इथेही घेतात शुद्ध म न घेतल्यास 'मार्ग बिहाग' राग होतो असे मत आहे.
३) ३ ही सप्तकांेत सारखेच चलन
४) बिहाग सारखेच सुरुवातीला रे ध अल्प व नंतर स्पष्ट लावले जातात.
५) समप्राकृतिक राग :- कल्याण व बिलावल कल्याण पासून शुद्ध म च्या प्रयोगाने वेगळा होतो व कल्याण अंगामुळे बिलावल पासून.

- ❖ **अभिनव संगीतांजली :-**

जाति :- वक्र- षाडव संपूर्ण ग्रह स्वर :- षड्ज अंश स्वर:- ग तीव्र म न्यास - पंचम अपन्यास - मध्यम विन्यास - सा. समय :- रात्रीचा १ प्रहर प्रकृति:- तरल, चंचल.

आधुनिक काळात अतिशय प्रचारात येत असलेला. प्रत्येक स्थानावर वेगळा रागांची छाया दिसते. 'सारेनिसाग' एवढा बिहाग पण म वर न्यास केल्यास नंदची छाया दिसते. सागमप मप केल्याने सुहाग राग. परंतु गमगरेसा तान घेऊन कल्याणची छाया दाखवतात. त्यामुळे यास सगळे संकीर्ण राग म्हणतात. त्यामुळे वेगवेगळे अंग दाखवताना काळजीपूर्वक स्वर विस्तार करावा लागतो. तरीही आरोहात बिहाग व अवरोहात कल्याण यांचाच प्रयोग बहुतेक विद्वान करतात. काही आरोहात सुहाग व अवरोहात कल्याण असेही स्वरूप दाखवतात.

- ❖ **रागदर्शन :-**

प्राचीन ग्रंथामध्ये फक्त मारुचा उल्लेख मिळतो. मारु व बिहाग रागांचे मिश्रण दोन्ही रागांना जोडणारा स्वर म्हणजे पंचम. जाती:- ओडव- संपूर्ण पूर्वांग प्रधान राग शांत व संथ. रिषभाला विशेष प्राधान्य मपगमगरेसा . अशा जेव्हा मपम गरेसा उपयोग होता तेव्हा तो जबरदस्तीनेकेल्यासारखे वाटते व तिथे पुरिया कल्याण दिसून येतो. शुद्ध म ने बिहाग स्पष्ट होतो. मगरेसा सागमग या स्वरांनी 'मारु' दाखवला जातो. मारु रागात शुद्ध म कधीच घेत नाहीत: समप्राकृतिक:- मरुत् यात रिषभ वर्ज बाकी सर्व मारु प्रमाणे शुद्ध म न घेतल्यास पूर्णत: मारु राग गायल्यासारखे होते.

- **अभिनव गीतांजली:- (रामाश्रय झा )**

वादी संवादीवरून मतभेद आहेत. काही प-सा, काही ग-नी मानतात. परंतु पूर्वांगप्रधान राग असल्याने पंचमच वादी योग्य कारण सा ते प पर्यंत आपण रागांचा सप्तकाचा पुर्वांग मानतो. त्याचप्रमाणे बहुतेकचीजांची सम पंचमावर दिसून येते तसेच या रागात पंचमाला इतके महत्त्व व लगाव आहे की राग सुरू करताक्षणी पंचम लावण्याची इच्छा होते.

रिषभाला काही जण संवादी मानतात. षड्ज पंचम भावाच्या दृष्टीने हे बरोबर असले तरी या रागात रे-ध तसे बिहागप्रमाणे दुर्बलच म्हणावे लागतील. कल्याण अंग जरी दिसून येत असले तरीही रिषभाला विशेष न्यास नाही. तो सा चा कण घेऊनच गायला जातो. आरोहात रिषभाला कुठेही स्थान नाही. त्यामुळे सा महत्त्वाचा म्हणून वादी संवादी प-सा योग्य जर सा ला संवादी मानले तरी वादी संवादी दोन्ही पूर्वंगातील होतील जे रागनियमात बसत नाही.

काही विद्वानांचे या रागासंबंधी अशी मत आहे की याची रचना मुंबईचे सुप्रसिद्ध ३.स्वर्गीय अल्लादिया खॉ साहेबांनी केली.

**कल्पना संगीत:-**

१) महाजातीतील राग

२) बिहाग रागाच्या वृक्षावर मारु रागाचे कलम केलेला असा हा राग.

३) लालित्य भरपूर आहे परंतु त्याचा भारदस्तपणापेक्षा अल्लडपणाकडे अधिक कल दिसतो. यात आरोहात उत्कंठा व आरोहात नाजूक वेदना दर्शविल्या जातात.

४) रे ला भरपूर वाव क्वचित अवरोहात प वर्ज केल्याने नवी शोभा दिसते.

५) तिव्र म च्या प्रभावामुळे यास तीव्रा जातीत घालावे लागते परंतु याची निर्मिती बिहागपासून झाल्याने चलन त्यासारखे आहे.

# राग:- शुद्ध कल्याण ( भूप-कल्याण)

तीव्र स्वर :- म

आरोहात वर्ज :- म व नी

जाति :- ओडव - संपूर्ण

वादी :- गांधार रे. थाट:- कल्याण

संवादी :- धैवत प

समय :- रात्रीचा १ ला प्रहर

आरोह :- सा ग रे ग प सा ध सां

अवरोह :- सा नि ध प म ग रे , प ग प रे सा.

विशेष :-

१) भूप व कल्याण दोन रागांचे मिश्रण आरोह भूपाळी सारखा व अवरोहात म व नी हे मींड युक्त येतात.

२) अवरोहात तानेच्या वेळी म व नि घेतात. सां नि ध प अश्या नी च्या उपयोगाने कल्याणची छाया स्पष्ट होते. आलाप संपवितांना 'ग प रे सा' असे घेतात.

३) आवरोहात आलाप प वर न्यास करून संपवतात.

४) म नि वर्ज करून भूपालीचेच स्वर 'गपरेसा' असे स्वर घेऊनही शुद्ध कल्याण गायला जातो. जुन्या चिजांमधे हे दिसून येते.

- **राग निधी** :- आरोप भूप + अवरोह कल्याण

कर्नाटक संगीत मोहन कल्याणी याच्याशी मिळता जुळता. मोहन = भूक व कल्याणी = कल्याण.

- **भारतीय सं** :- उत्तमराम शुल्क :- काही विद्वान वादी रिषभ मानतात म्हणून संवादी पंचम मानला जातो. यमुना कल्याण रागांच्या पूर्वी गायला जातो.

- **कल्पना सं** :- गोविंद टेंबे

१) तिव्रा जातीचा राग भूपरागाच्या सापत्न बंधूप्रमाणे शोभतो.

२) भूपचे गांभीर्य आहे परंतु त्या इतका उदात्तपणा व दरारा नाही.

३) वादी संवादी रे-प आहेत. ग-रे, प-रे स्वरसंगती जास्त.

४) तार षड्जावर धैवताचा थोडा आधार घेवून प वरून प ध प सा असे जातात.

५) सुरवासीन व आळशी वृत्तीमुळे मंद्र सप्तकांत गातात. वृत्ती भारदस्त असल्यामुळे क्षूद्रालंकार शोभत नाहीत. तसेच गमक व मींड अवजड अलंकार सुद्धा चालत नाहीत. रिषभास महत्व खूप आहे.

६) सं. सुबोध प्रमाणे वादी संवादी ग-ध मानले आहेत.

# राग :- मियॉ की तोडी

अभिनव संगीतांजली :- ओंकारनाथ ठाकूर

कोमल स्वर :- रे ग ध

तीव्र स्वर :- मध्यम रा - प

वादी स्वर :- गांधार ( ग) धैवत (ध)

संवादी स्वर :- धैवत (ध) गांधार (ध)

जाती :- षाडव- संपूर्ण

थाट :- तोडी

आरोह :- सा रे ग मे ध नि सां

अवरोह :- सा नी ध प मे ध म ग रे ग रे सा

मुख्य अंग :-

रस :- करुण व भक्ती

विशेष :-

१) तोडीचाच एक प्रकार आहे. प्रचारात असलेला राग जनक राग आहे.

२) पंचमा आरोहात संपूर्ण वर्ज्य पंचमाचा अल्प उपयोग आहे.

३) सं. कौमुदी नुसार आरोहात प घेतात त्यामुळे जाती संपूर्ण मानतात. आरोहात 'प' मात्र दुर्बल प्राचीन नाव ' पंतुवराली' मेल आहे. उत्तरांग प्रधान राग विशेष माहिती अशी सांगतात की तानसेन गुजरी तोडीत पण घेऊन मियॉ की तोडी तयार करून प्रसिद्ध केला यालाच दरबारी तोडी असेही म्हणतात.

४) जनक राग अतिकोमल गांधार समप्राकृतिक - मुल्तानी परंतु यापासून वाचवण्यासाठी नि सा ग म प करत नाहीत. म ची आस घेऊन ग लावल्यास मुल्तानीचा भास होतो म्हणून ग वेगळाच लावतात (स्वतंत्रपणे)

५) भक्तीरसप्रधान राग :-

- **रागनिधी**:- २ प्रकारे १) षाडव- संपूर्ण २) संपूर्ण संपूर्ण

जर या रागात पंचमास महत्त्व दिले तर बहादुरी तोडी होतो.

- **कर्नाटक सं**. :- हनुमात् तोडी म्हणतात काट्यापयादी संख्या पद्धती नुसार ८व्या मेलकर्ता हनुमत् तोडी जो भैरवी सारखा आहे त्याच्याशी तोडीची तुलना करतात. रागम् तानम् पल्लवी साठी हा राग गायला उपयुक्त मानतात. व्यंकटमरवीनी याचे नाव जन( jana) तोडी ठेवले. या रागात दातु स्वरांना महत्त्व आहे( svara skipping ) प पूर्णपणे वर्ज केल्यास शुद्धतोडी राग होतो. हा सायंकालीन राग मानला जातो कारण भैरवीशी मिळताजुळता आहे परंतु भैरवी सकाळी गातात.

- **भारतीय सं**:- वादी :- धैवत संवादी: रिषभ समय :- दिवसाचा दूसरा प्रहर

निद्राल सांगा कपटेन युक्ता कान्तंस्मरन्ती विरहेन युक्ता |

सौंदर्यपूर्ण कमलायताक्षी सा पूर्वी शेष दिने तुरी पे ||

कर्नाटक सं. कामवर्धिनी थाट व प्राचीन ग्रंथानुसार 'रामक्रिया' मेल म्हणतात.

- **कल्पना संगीत:-**

मींड व सौम्य गमक अलंकार शोभतात. करुणा, उत्कंठा व आर्तता हे ३भावक्रमाने मंद्र ते तार स्वरांत दिसून येतात.

**मतभेद** :-

अ) जाती - १) षाडव- संपूर्ण २) संपूर्ण संपूर्ण

ब) वादी संवादी १) ध-ग २) ग-ध ३) ध- रे

क) पंचमाच्या उपयोगाबाबत